
# नवजात बाळा मध्ये स्तनपाचे निरीक्षण

का ? आणि कसे

4

N-1

**विषय N १**







# लोक काय समजतात? आपण कसे ओळखणार की नवजात बाळ स्तनपान चांगल्या प्रकारे करत आहे?

समोर कार्ड ठेवा आणि सहभागीना संपूर्ण बिंदु एक एक करुन शिकवण्यास सांगा
एक एक करुन प्रत्येक प्रश्नाचे उत्तर विचारा

विशेषकरून दाखवा की हे प्रश्न नवजात बाळासाठी आहे. मोठ्या बालकांसाठी नाही.

हे सांगा की ह्या प्रश्नांच्या उत्तरासाठी आपण आपला स्वत:चा दृष्टिकोण दाखवायचा नाही तर आपण विचार करून हे दाखवायचे आहे की गावातील लोक स्तनपान कशा प्रकारे समजत आहे.

**लोक ह्या विषयाबद्दल काय विचार करत आहे, हे विचारा**

- नवजात बाळाला किती वेळा स्तनपान करायला पाहिजे?
- एका स्तनाचे दुध पिण्यासाठी बाळाला किती वेळ लागला पाहिजे?
- बाळाला तोंडाने दुध ओढण्यासाठी किती शक्तीची गरज लागते?
- बाळाला स्तनपान करतांना प्रत्येक वेळा दोन्ही स्तनातून स्तनपान करायला पाहिजे?


ह्या सगळया गोष्टींची थोडा वेळ चर्चा करा आणि प्राप्त उत्तर लिहीत जा.



## लोक काय समजतात? ते कसे ओळखतात की नवजात बाळ चांगल्या प्रकारे स्तनपान करत आहे.



- ❖ बाळाला स्तनपान किती वेळा करायला पाहिजे.
- ❖ बाळाला स्तनपान किती वेळेच्या फरकाने करायला पाहिजे.
- ❖ बाळाला किती शक्ति ने स्तनातून दूध शोषायला पाहीजे.
- ❖ केवळ एका स्तनातून अथवा दोन्ही स्तनातून स्तनपान करायला पाहीजे.







# स्तनपानाचे निरीक्षण कसं करायचे आहे ?

सहभागींना स्तनपानाचे निरीक्षण करण्यासाठी पहिल्यापासून व्यवस्था करायला करा.

यासाठी कमीत कमी दोन मातांना बोलवावे ज्यांचे बाळ २ महिन्यांपेक्षा कमी वयाचे आहे. त्यांना प्रथमच हे सांगायला हवे की त्यांना कमीत कमी २ तासांपर्यंत बैठकिमध्ये उपस्थित राहायचे आहे. आणि संपुर्ण महिला सहभागीं बाळाचे स्तनपान बघणार आहेत जर शक्य असेल तर २ बाळातून एक बाळ असे असेल की जे निर्धारित वेळेपुर्वीच जन्म झालेले असेल अथवा जन्माच्या वेळी त्याचे वजन २ किलो पेक्षा कमी असेल आणि एक बाळ संपूर्णत: सदृढ असेल, ज्याचे वजन जन्मापासून ३ किलो असेल. प्रथम स्वस्थ बाळाच्या स्तनपानाच्या निरीक्षणापासून प्रारंभ करावा बाळाच्या आईला आग्रह करा की ती सहभागीच्या दिशेला तोंड करून आपल्या बाळाला स्तनपान करेल. जर बाळ झोपत असेल आणि उठत नसेल तर निरीक्षण बैठकीच्या शेवटी ठेवावे.

जर तेथे बऱ्याच माता आणि बाळ उपस्थित असतील तर सहभागींना आणखीन जास्त निरीक्षणाची संधी मिळेल

लक्षात ठेवा:
बाळाच्या आईला मार्गदर्शन / समुपदेशन देण्याचा प्रयत्न करू नये. त्यांना केवळ निरीक्षण करण्यासाठी प्रोत्साहीत करा.

उजव्या बाजुला लिहलेल्या बिंदुचा उपयोग करून सहभागींना प्रत्येक बिंदुनुसार जागरुन राहून निरीक्षण करण्यासाठी मार्गदर्शन करा.


- बाळाची आई आरामाने बसली आहे अथवा झोपली आहे (जर माता आरामात बसलेली नसेल तर बाळ अधिक वेळेपर्यंत आईच्या स्तनातुन दुध शोषण करु शकत नाही. एक सदृढ बाळ सामान्यत: एकुण १० मिनिटापर्यंत एका वेळेला स्तनपान करु शकतो.)
- बाळाच्या पुर्ण शरीराला आधार मिळत आहे? (जर बाळाला चांगल्या प्रकारे आधार मिळत असेल तर बाळ न थकता फार वेळा पर्यंत स्तनपान करु शकतो.)
- बाळाचे डोके थोडंसे मागे वाकलेल आहे का? (जर बाळाचे डोके पुढ वाकलेले असेल तर बाळाला श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.)
- एरिओला (स्तनाचा काळा भाग) चा जास्तीत जास्त भाग बाळाच्या तोंडात आहे का? (बाळाच्या चांगल्या स्तनपानाच्या स्थितीत स्तनाचा वरचा काळा भाग फार कमी दिसून येते.)
- स्तनपान करतांना मध्ये मध्ये दुध पिण्या अगोदर पुर्वी बाळ किती वेळा स्तन शोषत आहे? (सामान्यत: एका स्वस्थ अथवा पुर्ण वेळेच्या आत जन्मलेला सुदृढ बाळ १० ते १५ वेळा स्तन शोषते.)
- बाळ स्तनपान करतांना वारंवार सुस्त होऊन झोपत आहे का? (एका सुदृढ भुकेला बाळ कमीत कमी एका स्तनाचे दुध पुर्ण पीऊ पर्यंत झोपु शकत नाही. इथ पर्यंत की जर बाळ झोपला असला तरी तो पुन्हा जागु शकतो आणि पुन्हा पुर्ण शक्तिने दुध शोषुन घेण्यास सुरुवात करेल. एक सुदृढ बाळ एका वेळी एका स्तनपानामध्ये कमीत कमी एका स्तनाचे पुर्ण आणि दुसऱ्या स्तनाचा काही भाग रिकामा करु शकतो.



# स्तनपान चे निरीक्षण कसं करणार ?



- ❖ काय बाळाची आई आरामात बसली आहे अथवा झोपली आहे.
- ❖ काय बाळाच्या शरीराला चांगल्या प्रकारे पुर्ण आधार मिळत आहे.
- ❖ काय बाळाचे डोके थोडेसे मागच्या दिशेला झुकलेले आहे.
- ❖ काय स्तनाचा काळा भाग पुर्ण पणे बाळाच्या तोंडात आहे.
- ❖ काय बाळ स्तनातून वारंवार दूध शोषत आहे.
- ❖ काय स्तनपान करण्याच्या वेळी बाळ झोपत तर नाही ना ?









# अशक्त बाळ स्तनपान कसे करते ?

निरोगी बाळाचे निरीक्षण केल्यानंतर, अशक्त निरोगी बाळाला, अशक्त लहान बाळाच्या सोबत पुन्हा निरीक्षण करावे. उजव्या बाजुच्या बिंदुंचा उपयोग करुन सहभागींना प्रत्येक बिंदु नुसार सावधगिरीने निरीक्षण करण्यासाठी मार्गदर्शन करा.

जर अशक्त बाळाचे वय १ महिन्यापेक्षा कमी असेल तर सहभागींनी जरा लांब राहून बाळाला विनास्पर्श प्रोत्साहीत केले पाहिजे.

जर निरीक्षण करण्यासाठी अशक्त बाळ मिळत नसेल तर उजव्या बाजूला लिहलेल्या बिंदुचा उपयोग करुन केवळ निरोगी बाळ आणि अशक्त बाळ मध्ये असलेल्या फरकावर चर्चा करणे.

१. बाळाची आई आरामाने बसली आहे अथवा झोपली आहे ?

२. बाळाला शरीराचा पुर्ण आधार मिळत आहे कि नाही? (अशक्त बाळाला अधिक सावधानीपुर्वक शरीराचा आधार देण्याची आवश्यकता असेल त्या करीता बाळाला एका हाताने आधार देऊन दुसऱ्या हाताचा उपयोग स्तन योग्य स्थितीत ठेवण्याकरीता केला पाहिजे, ज्यामुळे बाळ सहज स्तनपान करु शकेल.

३. काय बाळाचे डोके थोडेसे मागच्या बाजुला झुकलेले आहे ?

४. काय एरिओला (स्तनाचा काळा भाग) जास्तीत जास्त भाग बाळाच्या तोंडात आहे. (जर बाळा अशक्त असेल तर ते स्तनाचा काळा भाग पुर्ण पणे तोंडात घेऊ शकत नाही)

५. स्तनपान करत असतांना मध्ये मध्ये दुध शोषण करण्यापुर्वी बाळ किती वेळा सतत स्तन चोखत आहे.


- अशक्त बाळ दुध कमी ओढणार आणि नंतर काही काळ स्वत:ला आराम मिळण्यासाठी स्तन चोखने बंद करणार.

६. काय बाळ स्तनपान करत असतांना वारंवार सुस्त होऊन झोपत आहे ? (एक अशक्त बाळ हळू-हळू स्तनपान करण्यासाठी अधिक वेळ घेतो आणि वारंवार झोपतो. त्याला वारंवार जागे करण्याची आवश्यकता असते बाळ एका वेळेला एका स्तनाचे दुध पुर्णपणे पीऊ शकत नाही. पण अश्या बाळाला अपेक्षेपेक्षा जास्त वेळा स्तनपान केले पाहीजे (प्रत्येक तासाला अथवा त्याच्यापेक्षा ही कमी वेळेच्या अंतराने)



# अशक्त बाळ स्तनपान कसे करतो ?







# अशक्त बाळ आणि कमजोर बाळाच्या स्तनपानामध्ये काय फरक आहे.

**कार्ड दाखवा**

सहभागींना दाखवा की आता पर्यंत हे स्पष्ट व्हायला पाहिजे की अशक्त बाळाचे स्तनपान सुध्दा अशक्त असते.

**विचारा:**

लहान आणि अशक्त बाळाव्यतिरिक्त कोणते बाळ पुर्ण शक्तीने स्तनपान करु शकत नाही.

चर्चा करण्यासाठी संधी दया नंतर थोडक्यात सांगा की लहान आणि अशक्त बाळ पुर्ण शक्ती ने स्तनपान करु शकत नसेल तर हया गोष्टींची शक्यता असते की बाळ आजारी आहे.

उजव्या बाजुला देण्यात आलेल्या बिंदुचा उपयोग करुन अशक्त बाळ आणि आजारी बाळ यांच्या स्तनपानामध्ये असलेल्या फरकावर चर्चा करा हे सुनिश्चित करा की प्रत्येक सहभागी दोन्ही मधील फरक चांगल्या प्रकारे समजून घेतील.

हया प्रकारे नवजात बाळाचे निरीक्षण करणे आवश्यक असते. हे पाहून कोणी ही हा निर्णय घेऊ शकतो की अशा बाळाची देखभाल घरात करायची की त्यास ताबडतोब उपचारा करिता रुग्णालयात / दवाखान्यात घेऊन जायचे.

दोन प्रकारचे बाळ शक्तिनुसार स्तनपान करत नाहीत.

१. अशक्त बाळ

- काही बाळ अशक्त जन्मतात. उदाहरणार्थ वेळेच्या पुर्व जन्मलेला बाळ अथवा कमी वजन असणार बाळ.
- वेळेवर जन्मलेल्या बाळ अथवा जन्माच्या वेळी योग्य वजन असणारे बाळ यांच्या सारखे शक्तीने स्तनपान करु शकत नाही.
- असे बाळ जन्म झालेल्या दिवसापासूनच अशक्त असतात आणि आवश्यकतेनुसार स्तनपान करु शकत नाही.

२. आजारी बाळ

- बाळ जन्म झाल्यानंतर केव्हाही आजारी पडू शकतात पण सामान्यत: जन्म झाल्यानंतर पाहिल्या दोन दिवसात आजारी पडू शकत नाही.
- कोणत्याही अशा बाळाला आजार आहे म्हणू शकतो जे जन्माच्या वेळी कमजोर नव्हते परंतु कमजोर जन्मलेल्या बाळास आजार होण्याची संभावना पण जास्त असते. हे पण होऊ शकते की एक बाळ जन्म घेतल्यानंतर चांगल्या प्रकारे स्तनपान करत आहे पण जर ते आजारी पडले तर त्याची स्तनपान करण्याची इच्छा कमी होते.

हयाप्रकारे आम्ही सगळेजण पाहू शकतो की,


एखादे बाळ जे जन्म झाल्यावर योग्य प्रकारे स्तनपान करु शकत नसेल तर ते जन्मापासूनच अशक्त आहे. हया प्रकारे बऱ्याच बाळांची काळजी घरात सुध्दा घेतली जाऊ शकते. जर बाळाला कमी स्तनपान केले तर ते अशक्तच राहणार. जर बाळ जन्म झाल्यानंतर पुर्ण शक्तीने स्तनपान करु शकत असेल पण हळू हळू त्याची ती शक्ती कमी होत असेल तर ते आजारी होऊ शकते. अशा प्रकारच्या बालकांना जर तात्काळ रुग्णालयात औषध उपचार जर मिळाले नाही तर त्यांची मृत्यु सुध्दा होऊ शकतो.



# अशक्त बाळ आणि आजारी बाळ यांचे स्तनपानात काय फरक आहे ?









# आपल्याला स्तनपानाचे निरीक्षण केव्हा करायला पाहिजे ?

**कार्ड दाखवा**

**आता आपल्याला स्तनपानाचे महत्व समजून आले आहे तर या पुढे या माहितीचा उपयोग आपण कसा करणार हयाची चर्चा करुया.**

**सहभागींना प्रत्येक प्रश्न वाचण्यास आणि चर्चा करण्यास सांगा.**

१. नवजात बाळाला स्तनपान करतांना पाहिल्याने आपणांस कोणकोणत्या बाबी समजतात ?

२. बाळाच्या जन्माच्या वेळेस दवाखान्यात स्तनपानाचे निरिक्षण होऊ शकते का ? दवाखान्यात हे निरीक्षण कोणी करायला पाहिजे / कोण करु शकतो.

३. जर बाळाचा जन्म घरी झाल्यास त्याचे निरीक्षण होऊ शकते का ? घरी त्याचे निरीक्षण कोण करु शकेल.

४. बाळाची स्तनपान करण्याची इच्छा कमी होणे हे गंभीर आजाराचे लक्षण आहे. जन्माच्या काही दिवसांनंतर आजारी पडणाऱ्या बाळाचे स्तनपान करतांनाचे निरीक्षण कोणी करायला पाहिजे ?

५. स्तनपानाचे निरीक्षण करतांना आपल्याला कोणत्या समस्या येऊ शकतात ? कुटूंबातील सदस्य निरीक्षण करण्यास विरोध करतील ? या समस्या आपण कशाप्रकारे सोडवू शकतो.

चर्चा करण्यासाठी प्रोत्साहन दया.


काही मिनिटे चर्चा केल्यानंतर पुढील कार्ड दाखवा.



# आपल्याला स्तनपानाचे निरीक्षण केव्हा करायला पाहिजे ?



- दवाखान्यात जन्म झालेल्या बाळाचे निरीक्षण कोणी केले पाहिजे ?
- घरामध्ये जन्मलेल्या बाळाचे निरीक्षण कोणी करायला पाहिजे ?
- घरामध्ये बाळ आजारी पडल्यास त्याचे निरीक्षण कोणी केले पाहिजे ?







# सारांश: स्तनपानाचे निरीक्षण

कार्ड दाखवा

- ❖ सहभागींना प्रत्येक बिंदु वाचण्यासाठी सांगा व बिंदु न समजल्यास परत समजावून सांगा.
- ❖ गरज पडल्यास पुन्हा एकदा बाळाच्या आईला स्तनपान करायला सांगुन त्याचे निरीक्षण करा.
- ❖ अशक्त बाळ उपलब्ध झाल्यास त्याच्या स्तनपानाच्या निरीक्षणाची संधी घ्या.



# सारांश : स्तनपानाचे निरीक्षण



## नवजात बाळास स्तनपान करतांना निरीक्षण केल्यास आपल्याला ही माहिती मिळते की:

❖ अशक्त किंवा लहान बाळ ज्याला घरी अतिरीक्त देखरेखीची आवश्यकता असते.

❖ आजारी बाळ ज्याला दवाखान्यात घेऊन जाण्याची आवश्यकता आहे.
- अशा मातांना सल्ला देण्यात यावा ज्यांना स्तनपानाच्या योग्य पध्दतीत समस्या येत आहे.



❖ कोणत्या गोष्टीचे निरीक्षण करायचे आहे.
- बाळाची आई आरामाने बसलेली अथवा झोपलेली आहे?
- बाळाच्या शरीराला व्यवस्थित आधार देण्यात आलेला आहे.
- आई आणि बाळाचे शरीर याची जवळीकता बरोबर आहे.
- बाळ आवश्यकतेनुसार योग्य पध्दतीने व शक्तीने स्तनपान करत आहे.
- बाळ वारंवार झोपत तर नाही.

❖ केव्हा निरीक्षण करायला पाहिजे.
- जन्मानंतर लगेच
- जेव्हा बाळाची आई तक्रार करेल की तिच्या बाळाची तब्बेत बरी नाही.





# पुढच्या महिन्याचे उद्दिष्टये - १

## जन्माच्या दिवशी (रुग्णालयातील जन्म) स्तनपानाचे निरीक्षण करणे.

कार्ड दाखवा

आणि सांगा की, पुढच्या महिन्यांसाठी हे पहिले कामाचे उद्दिष्ट आहे.

उजव्या बाजुला दिलेल्या बिंदुचा उपयोग करुन सहभागींना पुढे काय करावयाचे आहे, त्यासाठी मार्गदर्शन करा.

- सामान्यत: प्रत्येक महिन्याला आपल्या क्षेत्रात १-२ गर्भवती महिलांची रुग्णालयात संस्थार्गत प्रसुती होत असते.
- रुग्णालयातून घरीपरत येण्यापुर्वी एक दिवस अगोदर नवजात बाळाच्या आईला अवश्य भेट दया.
- अधिकाअधिक बालकांचे रुग्णालयामध्ये वजन घेण्यात येते आणि बाळ अशक्त होणे अथवा अतिरीक्त देखरेखीच्या स्थितीमध्ये कुटूंबियांना सल्ला देण्यात येतो हया गोष्टींची माहिती घेणे.
- हे सुध्दा होऊ शकते की बाळाचे रुग्णालय मध्ये वजन घेतले नाही आणि कुटूंबाला बाळाच्या अतिरिक्त देखरेखीचा सल्ला दिला नाही.
- बाळाच्या आईला विनंती करावी की तिने आपल्या समोर बाळाला स्तनपान करावं. शांतीपूर्वक १० ते १५ मिनिट पर्यंत निरीक्षण करा. जसे आज आपण अभ्यासले आहे.
- आपल्या गृहभेटी वेळी बाळ झोपले असेल किंवा त्याने नुकतेच स्तनपान केलेले असेल तर बाळाच्या आईला सांगा की आपण बाळाला स्तनपान करतांना पाहणार आहोत व त्यासाठी पुन्हा एक दोन तासाने गृह भेटीला येणार आहे.



# पुढच्या महिन्याचे कामकाजाचे उद्दिष्टये - १



## जन्मलेल्या दिवशी (संस्थातर्गत जन्म) स्तनपानाचे निरीक्षण करणे

- ❖ बाळ रुग्णालयातून घरी परत येणाच्या एक दिवस अगोदर नवजात बाळ व त्याच्या आईस रुग्णालयात भेटणार.
- ❖ जर रुग्णालयामध्ये कुटुंबाला कोणत्याही प्रकारे विशेष देखरेखीचा सल्ला दिला असल्यास त्या बाबींचा आम्ही शोध घेणार.
- ❖ आम्ही बाळाच्या आईला आमच्यासमोर बाळास स्तनपान करण्याचा आग्रह धरणार आणि त्याचे निरीक्षण करणार.





# पुढच्या महिन्याचे उद्दिष्टये - २

## जन्माच्या दिवशी (घरात प्रसव / प्रसुती) स्तनपानाचे निरीक्षण करणे.

कार्ड दाखवा

हे सांगा की, पुढच्या महिन्यांसाठी हे दुसरे उद्दिष्ट आहे.

उजव्या बाजुला दिलेल्या बिंदुचा उपयोग करुन सहभागींना पुढे काय करावयाचे आहे, त्यासाठी मार्गदर्शन करा.

- कधी कधी आपल्या क्षेत्रातील महिलांची प्रसूती घरी होते आणि ही प्रसुती कोणत्याही डॉक्टर अथवा नर्सच्या देखरेखीखाली होत नाही.
- ही आपली जबाबदारी आहे की, त्यांचे कुटूंब चांगल्या प्रकारे देखरेख करत आहेत.
- घरी प्रसुती होण्याच्या स्थितीत जर आपण पहिल्यापासूनच कुटूंबाला ही कल्पना दिली की प्रसूती पिडा झाल्यास कुटूंबाने आपल्याला सांगावे म्हणजे आपण जन्माच्या वेळी उपस्थित राहून नवजात बाळाला देण्यात येणाऱ्या प्रत्येक देखरेखीचे निरीक्षण करु शकू.
- प्रयत्न करा की प्रसूतीच्या नंतर लगेच गृहभेट करु शकाल.
- जन्माच्या नंतर लगेच बाळास स्तनपान करण्यास दिलेले आहे काय आणि बाळाला आईच्या दुधाव्यतिरिक्त दुसरे काही दिले गेले नाही ना याची खात्री करा.
- आईला विनंती करावी की आपल्या समोर तिने बाळास स्तनपान करावे शांतीपूर्वक १० ते १५ मिनिट पर्यंत निरीक्षण करा. थेट तसे जसे आम्ही अभ्यास केलेला आहे.
- आपल्या गृहभेटी वेळी बाळ झोपला असेल तर अथवा त्याने नुकतेच स्तनपान केल्यास आईला सांगा की त्या बाळाला स्तनपान करत असतांना बघणार आहे आणि एक दोन तासांनंतर पुन्हा गृह भेट करा.



# पुढच्या महिन्याचे उद्दिष्टये - २

## जन्माच्या दिवशी (घरात प्रसव / प्रसुती) स्तनपानाचे निरीक्षण करणे.



- ❖ घरी प्रसुती होण्याच्या स्थितीत आपण शक्य तितक्या लवकर नवजात बाळाच्या घरी भेट देऊ बाळाच्या आईला भेटु आणि शक्य असल्यास आम्ही जन्माच्या वेळी उपस्थित राहू.

- ❖ आम्ही निरीक्षण करणार की जन्म होताच लगेचच बाळाला स्तनपान दिले गेले आहे काय.

- ❖ आम्ही आग्रह धरणार की ती बाळाच्या आईने बाळाला स्तनपान करावे आणि त्या स्तनपानाचे आम्ही निरीक्षण करणार - जर शक्य असेल तर आम्ही जन्म बाळाच्या जन्मानंतर पहिल्या स्तनपानाचे पण निरीक्षण करणार.





# पुढच्या महिन्याचे उद्दिष्टये - ३

## बाळ आजारी पडल्यानंतर स्तनपानाचे निरीक्षण करणे.

कार्ड दाखवा

सांगा की, पुढच्या महिन्यांसाठी हे तिसरे उद्दिष्ट आहे.

उजव्या बाजुला दिलेल्या बिंदुचा उपयोग करुन सहभागींना पुढे काय करावयाचे आहे, त्यासाठी मार्गदर्शन करा.

- कधी कधी बाळ जन्माच्या नंतर काही आठवडयात आजारी पडू शकते अशा वेळी होणारा आजार बाळासाठी घातक ठरु शकतो.
- जर आजार गंभीर असेल तर बाळाचा जीव वाचवणे तेव्हा शक्य होते जेव्हा त्याचेवर रुग्णालयात तात्काळ उपचार होतील.
- जर आपण कुटूंबाला पहिल्यापासूनच माहिती दिली गेली की बाळ आजारी वाटल्यास त्यांनी आपल्याला सांगावे तेव्हाच कुटूंबातून आपल्याला बरोबर वेळेत माहिती मिळेल.
- हया प्रकाराची सुचना मिळताच लवकरात लवकर गृहभेट करा.
- शांतीपूर्वक १० ते १५ मिनिट पर्यंत निरीक्षण करा. थेट तसे जसे आम्ही अभ्यास केलेला आहे.
- जर आपल्या गृहभेटी वेळी बाळ झोपला असेल किंवा त्याने नुकतेच स्तनपान केले असेल तर मातेला सांगा की, बाळाला स्तनपान करत असतांना बघणार आहे आणि एक दोन तासांनंतर पुन्हा गृह भेट करा.
- जर बाळाने गेल्या दोन तासांत चांगल्या प्रकारे स्तनपान केले असल्यास आणि त्याला जागे करुन हि तो जागा होत नसेल तर कुटूंबात कल्पना दया की आणखी वाट न पहाता बाळाला लगेच रुग्णालयामध्ये उचित देखरेखीसाठी तात्काळ घेऊन जावे.



# पुढच्या महिन्याचे उद्दिष्टये - ३

## बाळ आजारी पडल्यानंतर स्तनपानाचे निरीक्षण करणे.



- ❖ बाळ आजारी असल्याची माहिती मिळताच आपण लवकरात लवकर गृह भेट करायला पाहिजे.

- ❖ आम्ही आग्रह धरु की आईने आपल्या समोर बाळास स्तनपान करावे तेव्हा स्तनपानाचे अवलोकन करु.

- ❖ जर बाळ आवश्यकतेनुसार शक्तिने स्तनपान करत नसेल तर आपण कुटूंबाला लवकरात लवकर रुग्णालयास जाण्याचा सल्ला देऊ.

